## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.५८/२०२३ मधील नि.४१ वरील आदेश

{लक्ष्मी नारायण ऑटो नोंदणीकृत भागीदारी तर्फे भागीदार प्रदिप दिनानाथ देसाई -वादी वि. रसिका मोहन वारंग वगैरे -प्रतिवादी }

अर्ज व म्हणणे वाचून पाहीले. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता क्रम २६, नियम ९ नुसार दावा मिळकतीची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी उपअधिक्षक भुमी अभिलेख, कुडाळ यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करावी याकरीता दाखल केला आहे.

२) वादींच्या कथनानुसार, त्यांनी प्रस्तुतचा दावा कायम व आज्ञार्थी ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादींच्या अभिकथनांनुसार दावा 'अ' मिळकत ही वादी यांची असून 'ब' मिळकत ही प्रतिवादी यांच्या मालकीची आहे. दोन्ही मिळकती या एकमेकांलगत असून प्रतिवादी यांनी 'ब' मिळकतीत बांधकाम करत असल्याचे भासवुन प्रत्यक्षात 'अ' मिळकतीत बांधकाम केलेले आहे. अशा परिस्थितीत विवादीत बांधकाम कोणत्या मिळकतीत आहे या मुद्दयाचा योग्य पध्दतीने निर्णय होण्यासाठी कोर्ट कमिशनरमार्फत मोजणी होवून त्याचा सविस्तर अहवाल येणे आवश्यक आहे. दावा मिळकत व तेथील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्याकरीता व उभय पक्षकारांमधील वादाचे अंतिमत: निराकरण होणेकरीता न्यायालयीन आयुक्त म्हणून उपअधिक्षक भूमी अभिलेख कुडाळ यांची नियुक्ती होणेकरीता वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादी यांनी सदर अर्जावर आपले लेखी म्हणणे दाखल करुन न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती करणेस प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी आपल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी स. नं. ४२अ१अ हि. नं. २९ या मिळकतीमध्ये बांधकाम केलेले आहे. सदर मिळकतीचा मालक प्रतिवादी आहे. दावा सदरामधील सदर मिळकत 'ब' मिळकत म्हणून दाखवली आहे. दावा मिळकत 'अ' मध्ये प्रतिवादींनी बांधकाम केलेले नाही. वादींनी सदरील दावा दाखल करत असताना प्रतिवादीने कोणत्या मिळकतीत बांधकाम केले आहे हे स्पष्ट केलेले नाही. वादीने दावा दाखल करणेपूर्वी सदरची बाब स्पष्ट करणे गरजेचे होते. परंतु वादी प्रस्तुत दाव्यामध्ये पुरावा गोळा करण्याच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज दाखल

केलेला आहे. पक्षकारास पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त मागण्याची तरतुद नाही. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली आहे.

४) वादींची दाव्यातील कथने विचारात घेता, दावा मिळकत 'अ' ही वादी यांच्या मालकीची असून दावा मिळकत 'ब' ही प्रतिवादी यांच्या मालकीची आहे. अशी परिस्थिती असताना दिनांक १/५/२०२३ रोजी प्रतिवादी १० ते १२ व्यक्तींच्या जमावासह बेकायदेशीरपणे दावा मिळकत 'अ' मध्ये घुसली व त्यांनी सदर भागामध्ये बांधकाम करण्यास सुरुवात केली. प्रतिवादी यांचे नि. ५६ वरील म्हणण्यामधील कथनांचा विचार करता त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी दावा मिळकत 'ब' मध्ये बांधकाम केलेले आहे. त्यांनी दावा मिळकत 'अ' मध्ये कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी यांनी वादी यांच्या मालकीच्या दावा मिळकत 'अ' मध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे किंवा कसे याबाबतची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी-प्रतिवादी यांच्या दरम्यान असलेल्या अतिक्रमणाबाबतचा वाद उपअधिक्षक, भुमी अभिलेख कुडाळ यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करुन दावा मिळकतींची सविस्तरपणे मोजणी करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन केलेल्या बांधकामाबाबतची मोजमापे देखील अभिलेखावर न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. करिता वादी यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) वादीचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२) उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कुडाळ यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करणेत येते.

३) न्यायालयीन आयुक्त यांना असे निर्देशित करणेत येते की, त्यांनी कमिशनपुर्व नोटीसा सर्व संबंधीतांना काढून दावा मिळकत 'अ' स. नं. ४२अ१अ हि. नं. २६-क व दावा मिळकत 'ब' स. नं. ४२अ१अ हि.नं. २९ या दोन्ही मिळकतींची रितसर मोजणी करुन प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकत 'अ' मध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करीत असल्यास सदर अतिक्रमित भागाचे मोजमापासह निश्चित क्षेत्र याचा सविस्तर अहवाल नकाशासह दोन महिन्याच्या आत न्यायालयात सादर करावा.

४) वादी यांनी न्यायालयीन आयुक्त यांची नियमानुसार फी उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, कुडाळ येथील कार्यालयात परस्पर जमा करावी.

५) वादीने न्यायालयीन आयुक्त यांचे शुल्क भरल्यानंतर कमिशनपत्र तात्काळ उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कुडाळ यांचेकडे पाठविण्यात यावे

सही/-

(अ. जो. बाचुलकर)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर

कुडाळ

ठिकाण : कुडाळ

दिनांक २०/०२/२०२४